वाचले -१) आदेश क्र.माध्य/शि/१/कावि/१६०६/२०१६,दि.१८/१०/२०१६

२) श्रीम.वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षक यांचा दि.२२/११/२०१६ रोजीचा अर्ज.

३) क्र.प्रशा/२/कावि/५४६/२०१६, दि.०७/१०/२०१६

४) मुख्याध्यापक यांचे दि.२४/११/२०१६ रोजीचे पत्र.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ १०८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/१७६८/१६
दिनांक :- २८/११/२०१६

विषय - श्रीम.वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षक यांचे स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबत.

आदेश, संगणक क्र. ५७५५

श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका हया पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील सहाय्यक शिक्षिका या गट क मधील पदावर माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव येथे कार्यरत आहेत. त्यांनी दि.२७/०७/२०१६ रोजीच्या अर्जान्वये घरगुती अडचण या कारणास्तव स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केलेली होती.

श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका यांनी दि.२७/०७/२०१६ रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळावी म्हणुन केलेली विनंती मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव यांचे कडिल शिफारस व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ मधील उक्त तरतुद विचारात घेऊन प्रदान केलेल्या अधिकारानुसार श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका यांना दि.३०/११/२०१६ रोजी मध्यान्होतर महापालिका सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्ती देण्यास आदेश क्र. माध्य/शि/१/कावि/१६०६/२०१६, दि.१८/१०/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली होती.त्यानंतर श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका यांनी दि.२२/११/२०१६ च्या अर्जान्वये सद्यस्थितीला सदरचा स्वेच्छा सेवानिवृत्ती आदेश रद्द करून मिळावा, अशी विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्त वेतन)नियम १९८२ मधील ६६ चे कलम(५) मध्ये ज्या शासकीय कर्मचा-याने या नियमानुसार सेवानिवृत्त होण्याची निवड करून नियुक्ती प्राधिका-याला तशा आशयाची नोटीस दिलेली असेल, त्या शासकीय कर्मचा-याला अशा प्राधिका-याची स्पष्ट मान्यता असल्याशिवाय अशी नोटीस मागे घेण्यास प्रतिबंध असेल.परंतु नोटीस मागे घेण्याची विनंती त्याच्या सेवानिवृत्तीच्या इच्छित तारखेपुर्वी करण्यात आलेली असली पाहिजे.

मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव यांनी जा.क्र.७९७/२०१६, दि.२४/११/२०१६ अन्वये श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका यांची मंजुर केलेली स्वेच्छा निवृत्ती रद्द करून दि.२२/११/२०१६ अन्वये दिलेल्या अर्जाप्रमाणे स्वेच्छा निवृत्तीचे आदेश मिळावे असे कळविले आहे.

सबब, मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षक विभाग,पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८ उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका यांना दिनांक ३०/११/२०१६ रोजी मध्यान्होतर महापालिका सेवेतुन स्वेच्छा सेवानिवृत्ती देण्यास परवानगी देण्यात आलेला आदेश रद्द करून त्यांनी नव्याने दिलेल्या अर्जानुसार श्रीम. वैद्य विणा प्रविण,सहाय्यक शिक्षक यांना दि.२८/०२/२०१७ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेणेस मान्यता देण्यात येत आहे.तसेच भविष्यात लेखापरिक्षणांतर्गत काही येणे रकमा निघाल्यास सदरच्या रकमा संबंधितांचे निवृत्ती वेतनामधुन वसुल करणेत येतील. प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Kamble
२९/११/१६
प्र. शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्रीम. वैद्य विणा प्रविण, सहाय्यक शिक्षिका
सहाय्यक शिक्षक माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव

प्रत :- १) लेखा विभाग

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंद कक्ष,संगणक कक्ष (प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग



Scanned with CamScanner